महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात करण्यासाठी स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय समन्वय समितीचे पुनर्गठन करणे व तिची कार्यकक्षा वाढविणेबाबत

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्र.इबांका २०१७/प्र.क्र.२७९/कामगार-७

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ६ डिसेंबर, २०१७

<u>वाचा :-</u> १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक इमारत २०१३/प्र.क्र.२६/कामगार ७अ, दि.२५.२.२०१३

२) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.मइवइबाकमं/संनियंत्रण समिती/१७४/२०१७, दि.१८.८.२०१७

३) महानिदेशक (श्रम कल्याण), श्रम एवं रोजगार मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली यांचे क्र.अ.शा.पत्र क्र.झेड २००१२/१२/२०१७-बीएल, दि.६.१०.२०१७

<u>प्रस्तावना :-</u>

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणी करण्यासाठी जिल्हास्तरावर समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे व यासाठीची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

यासंदर्भात आजपर्यंतचा अनुभव पहाता बांधकाम कामगारांच्या नोंदणीत भरीत अशी प्रगती दिसत नाही. तसेच देश पातळीवरील National Sample Survey Office (NSSO) एनएसएसओ या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात सन २०१५-१६ अखरे सुमारे २७.५३ लक्ष बांधकाम कामगार असून त्यापैकी जून २०१७ पर्यंत मंडळाकडे केवळ ६.१० लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे. त्यापैकी २.९८ लक्ष कामगार जिवीत आहेत. बांधकाम कामगाराच्या नोंदणीत व नुतनीकरणात वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे. जिल्हयातील सर्व बांधकाम आस्थापनांची नोंदणी, बांधकाम कामगारांची नोंदणी व बांधकाम कामगारांना लाभाचे परिणामकारक वाटप व १% उपकर मंडळाच्या खाती जमा करणे याबाबत नियमित आढावा घेऊन अंमलबजावणीमधील अडी-अडचणी दूर करण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या समितीमध्ये अंशत: बदल करुन तिची कार्यकक्षा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) काम करणाऱ्या कामगारांची तसेच जिल्हयातील सर्व बांधकाम आस्थापनांची नोंदणी, बांधकाम कामगारांची नोंदणी व बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचे लाभ देण्यासाठी व १% उपकर मंडळाच्या खाती जमा करणे याबाबत नियमित आढावा घेऊन अंमलबजावणीमधील अडी-अडचणी दूर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर गठीत केलेल्या समन्वय समितीमध्ये अंशत: बदल करून या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे जिल्हास्तरावर समन्वय समिती पुर्नगठीत करण्यात येत आहे.

१.	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२.	मा.लोकप्रतिनिधी (मा.पालकमंत्री यांनी सुचविलेले एक विधानसभा/ विधानपरिषद सदस्य)	सदस्य
३.	आयुक्त, महानगरपालिका	सदस्य
४.	मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद	सदस्य
५.	उपजिल्हाधिकारी (रोहयो)	सदस्य
६.	उपायुक्त (वॉर्ड ऑफिस) महानगरपालिका	सदस्य
७.	कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग	सदस्य
८.	कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग	सदस्य
९.	कार्यकारी अभियंता, विद्युत वितरण/पारेषण	सदस्य
१०.	कार्यकारी अभियंता, जीवन प्राधिकरण	सदस्य
११.	क्षेत्रीय अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ	सदस्य
१२.	जिल्हयातील मनरेगा व अन्य बांधकामाशी संबंधित केंद्र व राज्य यंत्रणेचे जिल्हयातील प्रमुख	सदस्य
१३.	इमारत बांधकाम व इतर कामगार कल्याणकारी मंडळाचे सदरहू जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करणारे सदस्य	सदस्य
१४.	सहाय्यक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी	सदस्य-सचिव

२. वरील समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील -

समितीची बैठक दर महिन्याला आयोजित करून खालील बाबींवर आढावा घेण्यात यावा.

अ) जिल्हयातील सर्व बांधकाम आस्थापनांची नोंदणी करणेबाबत आढावा घेणे.

ब) मनरेगा व इतर सर्व बांधकाम कामगारांची नोंदणी करणेबाबत आढावा घेणे

क) बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनेच्या लाभवाटपातील अडीअडचणी व करावयाची उपाययोजना याबाबत निर्णय घेणे

ड) बांधकाम उपकर मंडळाच्या खाती नियमित जमा होत असल्याबाबत खातरजमा करणे

इ) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कायद्याच्या अनुषंगाने बांधकाम आस्थापना व बांधकाम कामगार यांचे वेळोवेळी येणारे प्रश्न/तक्रारी याबाबत आवश्यक कार्यवाही करणे

३. सदरहु समितीमध्ये समाविष्ट असलेल्या सदस्यांशिवाय जिल्हयातील इतर विभाग प्रमुखांस निमंत्रित करावयाचे असल्यास जिल्हाधिकारी तथा समितीचे अध्यक्ष अशा अधिकाऱ्यास निमंत्रित सदस्य म्हणून बैठकीकरिता आमंत्रित करु शकतील.

४. सदस्य सचिव यांनी पार पडलेल्या समितीच्या बैठकीचे इतिवृत्त न चुकता बैठक झाल्यानंतर ८ दिवसांचे आत प्रधान सचिव (कामगार) व सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांना सादर करावे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२०६१२००१९८११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2017.12.06 12:04:47 +05'30'

(श.मा.साठे)
शासनाचे उप सचिव.

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
६. महाराष्ट्र राज्यातील सर्व मा.संसद सदस्य
७. महाराष्ट्र राज्यातील सर्व मा.विधानसभा /मा.विधानपरिषद सदस्य
८. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
९. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग.

हा शासन निर्णय आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या व सार्वजनिक उपक्रमांच्या निदर्शनास आणण्यात यावा.

१०.सर्व विभागीय आयुक्त.
११.सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
१२.सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
१३.कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई- ५१.
१४.सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१५.सर्व महानगरपालिका आयुक्त
१६.सर्व जिल्हाधिकारी
१७.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१८. सर्व अपर/उप कामगार आयुक्त
१९.सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो)
२०.सर्व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
२१.सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग
२२.सर्व कार्यकारी अभियंता, विद्युत वितरण/पारेषण
२३.सर्व कार्यकारी अभियंता, जीवन प्राधिकरण
२४.क्षेत्रीय अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
२५.सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती
२६.सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद
२७.सर्व नोंदणी अधिकारी (इमारत व इतर बांधकाम कामगार)

आपल्या अधिनस्त जिल्हयातील मनरेगा योजनेच्या सर्व कार्यान्वयीन यंत्रणेच्या जिल्हा प्रमुखांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणण्यात यावा.

२८. सर्व जिल्हास्तरीय मनरेगा कार्यान्वयीन यंत्रणा प्रमुख
२९.सर्व मंडळ सदस्य, विभाग - नाशिक, पुणे , नागपूर, औरंगाबाद, मुंबई कोकण.
३०.प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३१.उपसचिव (कामगार-७), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३२.निवडनस्ती (कामगार ७)